**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक १६ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीत बहुतांश जागांवर भाजप-महायुतीचे वर्चस्व.**
2. **विदर्भातील महानगरपालिकांमध्ये नागपुरात भाजपला घवघवीत यश, अकोला आणि अमरावतीत बहुमत तर चंद्रपुरात काँग्रेस आघाडीवर.**
3. **लातूरमधे काँग्रेस- वंचित बहुजन आघाडी, वसई- विरारमधे बहुजन विकास आघाडी तर मालेगावमधे इस्लाम पार्टीला यश.**
4. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीच्या भारत मंडपम इथं स्टार्ट अप महोत्सवाचं उद्घाटन.**

**राज्य निकाल-मुंबई/उर्वरित महाराष्ट्र**

राज्यातल्या एकंदर 2 हजार 869 जागांसाठी झालेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत 1088 ठिकाणी भाजपा न निर्णायक आघाडी अथवा विजय मिळवला आहे. याच प्रमाणे शिवसेना शिंदे गट 300, काँग्रेस 185, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट 140, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट 120 जागांवर आघाडीवर आहे उर्वरित अपक्ष आणि इतर पक्ष 160 जागांवर आघाडीवर आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांची मतमोजणी अखेरच्या टप्प्यात आहे. बहुतेक ठिकाणी भाजपाला आघाडी मिळाल्याचं चित्र आहे.आतापर्यंतच्या निकाल आणि कलानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेत भाजप ५६, शिवसेना (उद्धव ठाकरे) ४४, शिंदे गट २२ तर काँग्रेस १६ जागांवर आघाडीवर आहे. ठाणे आणि नवी मुंबईतही भाजप आघाडीवर असून, वसई-विरारमध्ये बहुजन विकास आघाडीने विजय मिळवला आहे. मालेगाव महापालिकेच्या ८४ जागांपैकी पहिल्या ४९ जागांच्या निकालात इस्लाम पार्टीला सर्वाधिक १९ जागांवर विजय मिळवला असून शिवसेनेला १८ जागांवर विजय मिळाला आहे. याशिवाय समाजवादी पार्टीने ५, एमआयएमने ४, भाजपने दोन जागांवर तर काँग्रेसने एका जागेवर विजय मिळवला आहे. लातूर महापालिकेत काँग्रेस आणि वंचित बहुजन पक्षाने आघाडी केली होती. या दोन्ही पक्षांचे मिळून ४७ उमेदवार विजयी झाले असून त्यापैकी ४३ काँग्रेसचे तर ४ वंचितचे उमेदवार आहेत. भारतीय जनता पार्टीला २२ जागी विजय मिळाला असून राष्ट्रवादी काँग्रेसचा फक्त १ उमेदवार विजयी झाला आहे. पुण्यात भाजपाला बहुतांश ठिकाणी आघाडी मिळताना दिसत आहे आणि राष्ट्रवादीला मात्र बराच संघर्ष करावा लागला आहे. नाशिकमध्ये भाजपने ६२ चा जादुई आकडा गाठत एकहाती सत्ता मिळवली आहे. जळगावमध्ये महायुतीचा दणदणीत विजय झाला असून

धुळे महापालिकेतही भाजपची एकहाती सत्ता येताना दिसत आहे. छत्रपती संभाजी नगर मध्ये 115 जागांपैकी 52 जगणवर भाजपा पुढे असून शिवसेना शिंदे गटाला 14 तर AIMIM ला 24 जागा मिळाल्या आहे.

**नागपूर/विदर्भ निकाल**

राज्यातल्या २९ महानगरपालिका निवडणुकीसाठीची मतमोजणी आज सकाळी १० वाजेपासून सुरु झाली. विदर्भातील नागपूर महानगरपालिकेत १५१ जागांपैकी एकूण १०२ जागांवर भारतीय जनता पक्षाचे उमेदवार विजयी झाले आहेत. झोन क्रमांक एक मधील प्रभाग १६, ३६, ३७, येथे भाजपचे सर्व उमेदवार विजयी झाले आहेत. प्रभाग 36 मधून भाजपच्या युवा मोर्चाच्या नागपूर अध्यक्ष शिवानी दानी सुद्धा विजयी झाल्या आहेत. नागपुरात 37 जागांवर काँग्रेस, 02 जागांवर शिवसेना शिंदे गट, एका जागेवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, एका जागेवर राष्ट्रवादी अजित पवार गट, तर आठ जागांवर अपक्ष उमेदवार आघाडीवर आहे. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला यंदा खात उघडता आलं नाही. एमआयएम पहिल्यांदा महानगरपालिकेत प्रवेश करू पहात आहे. सुमारे ७ जागांवर हा पक्ष पुढे आहे. चंद्रपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकूण १७ प्रभागांतील ६६ जागांपैकी सध्या १५ प्रभागांतील ६० जागांचा निकाल जाहीर झाला आहे. जाहीर निकालानुसार काँग्रेसने २४ जागा मिळवत आघाडी घेतली असून भाजप २१ जागांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) ६, जनविकास सेना ३, तर अपक्षांनी २ जागांवर विजय मिळवला आहे. याशिवाय शिंदे गटाची शिवसेना, AIMIM, BSP आणि वंचित बहुजन आघाडीला प्रत्येकी १ जागा मिळाली आहे. उर्वरित प्रभागांचे निकाल जाहीर झाल्यानंतर महापालिकेतील अंतिम सत्तासमीकरण स्पष्ट होणार आहे. **अमरावती** महानगरपालिकेच्या २२ प्रभागांतील ८७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत आतापर्यंत ६४ जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. यात भाजप २१, काँग्रेस १४, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) १३, एमआयएम ६, युवा स्वाभिमान पक्ष ३, शिवसेना ठाकरे गट ३ आणि शिवसेना शिंदे गट ३ जागांवर विजयी झाले आहेत. उर्वरित जागांचे निकाल अद्याप जाहीर व्हायचे असून मतमोजणी प्रक्रिया सुरू आहे. या निवडणुकीसाठी एकूण ६६१ उमेदवार रिंगणात होते, त्यात १२० अपक्षांचा समावेश आहे. शहरात ६ लाख ७७ हजार १८० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. **अकोला** महानगरपालिका निवडणुकीत ८० जागांपैकी भाजपने ३७ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवलं आहे. काँग्रेसनं २० जागांवर विजय मिळवत दुसरा क्रमांक पटकावला. शिवसेना ठाकरे गटाला ७, वंचित बहुजन आघाडीला ५, तर एमआयएमला ३ जागा मिळाल्या आहेत. शिंदे गट शिवसेना, अजित पवार गट राष्ट्रवादी आणि शरद पवार गट राष्ट्रवादी यांना प्रत्येकी २ जागा मिळाल्या. या निकालामुळे अकोल्यात सत्तेचा तोल भाजपकडे झुकला असून महापौरपदावर भाजपचा दावा मजबूत झाला आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईत विजयी रॅलीला संबोधित करत आहे.

**निकाल प्रतिक्रिया/नितीन गडकरी/रामदास आठवले**

महाराष्ट्रातील सर्व २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांत भाजप-शिवसेना महायुतीला घवघवीत यश मिळाल्याबद्दलकेंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह पक्ष कार्यकर्त्यांचे अभिनंदन केलं आहे. विकासाला प्राधान्य देणाऱ्या महायुतीवर जनतेने विश्वास व्यक्त केल्याबद्दल आभार मानत, या विजयामुळे राज्यातील विकासाची गती अधिक वाढेल, असा विश्वास समाजमाध्यमवरील संदेशातून त्यांनी व्यक्त केला. मुंबई महानगरपालिका निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाल्याबद्दल केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेऊन अभिनंदन केलं. राज्यातील २९ महापालिकांपैकी २६ महापालिकांमध्ये महायुतीला बहुमत मिळाल्याचे श्रेय त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाला दिलं आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आज संध्याकाळी ६ वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर येथील निवासस्थानी येथे भेट देतील. त्यानंतर सगळे नेते महाल येथे विजयोत्सवात सहभागी होतील. आम्ही विजयाचा उन्माद करत नाही किंवा पराभवामुळे निराश होत नाही. जनतेला अपेक्षित आहे त्याच प्रकारे आम्ही विजय साजरा करू असं प्रतिपादन बावनकुळे यांनी नागपुरात पत्रकारांशी बोलताना केलं.

**'निवाडा महानगरांचा'**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या निकालांचं विश्लेषण करणारा विशेष कार्यक्रम 'निवाडा महानगरांचा', आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्त विभागातर्फे सादर करण्यात येणार आहे. आज रात्री ८ वाजून १० मिनिटांपासून हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. दररोज रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र आज रात्री ८ वाजता प्रसारित होईल.

**स्टार्टअप इंडिया**

स्टार्ट अप अभियानाने गेल्या १० वर्षांमधे क्रांती घडवून आणली असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राष्ट्रीय स्टार्टअप दिनानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित कार्यक्रमात आज ते बोलत होते. प्रत्यक्ष समस्यांना भिडण्याचं उद्दिष्ट युवकांनी ठेवलं असून त्यांच्या स्वप्नांचा प्रवास या दहा वर्षात अनुभवला असल्याचं ते म्हणाले. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी सांगितलं की २०१६ मधे ही मोहीम सुरु झाली त्यावेळी अवघे ४०० स्टार्टअप होते, ती संख्या आता दोन लाखांवर गेली आहे. या कार्यक्रमात पंतप्रधांनाही स्टार्ट अप उद्योजकांशी संवाद साधला.

**राहुल गांधी**

महाराष्ट्रातल्या महानगरपालिका निवडणुकीत मतदारांच्या बोटावर लावलेल्या शाईच्या दर्जावरून झालेल्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज निवडणूक आयोगावर टीका केली. मतचोरी हे देशविरोधी कृत्य असल्याचा पुनरुच्चार त्यांनी एका वृत्तपत्रातल्या बातमीचा फोटो समाजमाध्यमावर शेअर करून केला. तर मतमोजणी संपायच्या आधीच काँग्रेस पराभव मान्य करत आहे, असं भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. राहुल गांधी यांचा मतचोरीचा आरोप बिनबुडाचा आणि स्वतःचं अपयश लपवण्याचा प्रयत्न असल्याची टीका त्यांनी केली. दरम्यान या निवडणुकीत मतदार याद्या आणि इतर अनेक घोळ झाल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी आज पत्रकार परिषदेत केला.

**क्रिकेट**

महिला क्रिकेट प्रिमियर लिग मध्ये आज गुजरात जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यातली लढत नवी मुंबईच्या डीवाय पाटील स्टेडियमवर होणार आहे. सामना आज संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

**हवामान**

विदर्भात काही काळ किमान तापमानात वाढ नोंदविल्यानंतर कालपासून पुन्हा थंडी परतली आहे. आज गोंदिया इथं ९ अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. नागपुरात आज ११. ४ अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली आहे. उर्वरित जिल्ह्यांत तापमान १२ ते १५ अंश सेल्सियस दरम्यान आहे.

**मतदान टक्केवारी**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीत झालेल्या मतदानाची अधिकृत आकडेवारी आज राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केली. सर्व २९ महानगरपालिकांमधे मिळून सरासरी ५४ पूर्णांक ७७ शतांश टक्के मतदान झालं. सर्वात जास्त मतदान इचलकरंजी महानगरपालिकेत ६९ पूर्णांक ७६ शतांश टक्के झालं.

**महावितरण**

महावितरणच्या नागपूर ग्रामीण मंडळातील घोटीटोक आणि वडंबा ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्रांना जागतिक स्तरावरील आयएसओ 9001:2015 मानांकन प्राप्त झालं आहे. ७२ दुर्गम आणि आदिवासी बहुल गावांना वीजपुरवठा करणाऱ्या या उपकेंद्रांमध्ये २४x७ अखंडित वीज सेवा आणि कार्यक्षम ग्राहक सेवेसाठी केलेल्या सुधारणा आणि उत्कृष्ट व्यवस्थापनाची दखल म्हणून हे मानांकन देण्यात आले आहे.

*****